International Journal for Multidisciplinary Research
International Conference on Multidisciplinary Research & Studies 2023
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com

# पश्चिम विदर्भातील पूर्णा नदी खोऱ्यातील ग्रामीण लोकसंख्येचे केंद्रिकरण – भौगोलिक अध्ययन (२००१ ते २०११)

[1]प्रा. दत्तकुमार बापूराव भारसाकळे , [2]प्रा. डॉ. अजय जानराव सोळंके

[1]संशोधक विद्यार्थी (भूगोल), [2]भूगोल विभाग प्रमुख व संशोधन मार्गदर्शक
[1,2]संशोधन केंद्र – शिवरामजी मोघे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, केळापूर जिल्हा – यवतमाळ,
(संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती)

**सारांश**

**केवळ भारतातीलच नाही तर संपूर्ण जगातील अधिकांश लोकसंख्या ही ग्रामीण भागात वास्तव्यास आहे. मोठमोठ्या उद्योगांना लागणाऱ्या कच्च्या मालाचा पुरवठा हा ग्रामीण प्रदेशातूनच होत असतो. त्यामुळे ज्या ग्रामीण प्रदेशात लोकसंख्येचे अधिक केंद्रिकरण असते अशा प्रदेशात विकास हा तुलनात्मक अधिक असतो.**

**प्रस्तुत संशोधन निबंधामध्ये पश्चिम विदर्भातील पूर्ण नदी खोऱ्यातील ग्रामीण प्रदेशातील ग्रामीण लोकसंख्येच्या केंद्रीकार्नाचे अध्ययन स्थान निर्देशांकाच्या सहाय्याने करण्यात आलेले आहे.**

**बीजसंज्ञा: ग्रामीण लोकसंख्या, स्थान निर्देशांक, केंद्रिकरण, पूर्णा खोरे**

## प्रस्तावना:

एखाद्या प्रदेशात विशिष्ट लोकसंख्येचे फार मोठे वर्चस्व व प्रभाव असतो. भिन्न भिन्न प्रदेशातील लोकसंख्येचे प्रादेशिक वितरण असे दर्शविते की, त्यांच्या केंद्रिकरणाचे भाग वेगवेगळे आहेत. त्यांचे स्थान व क्षेत्र भौगोलिकदृष्ट्या भिन्न भिन्न असते. कोणत्याही वसाहतीचे स्थान आणि ठिकाणाचे महत्त्व इतकेच त्या सभोवतालच्या परिसराची मानवी वैशिष्ट्यही महत्त्वाची असतात. व त्यावरच कोणत्याही प्रदेशातील लोकसंख्येचे केंद्रिकरण अवलंबून असते.

कोणत्याही प्रदेशातील दोन दशकांदरम्यान वाढलेली ग्रामीण लोकसंख्या व त्या प्रदेशाचे क्षेत्रफळ यांच्या गुणोत्तराच्या आधारे त्या प्रदेशातील लोकसंख्येचे केंद्रिकरण काढले जाते. यालाच स्थान ग्रामीण लोकसंख्येचा स्थान निर्देशांक देखील म्हटले जाते.

प्रस्तुत संशोधनामध्ये अभ्यस प्रदेशातील ग्रामीण लोकसंख्येच्या केंद्रीकार्नाचे तालुकानिहाय तुलनात्मक अध्ययन करण्यात आलेले आहे.

## उद्दिष्ट्ये

प्रस्तुत संशोधनाचे प्रमुख उद्दिष्ट्ये पुढील प्रमाणे आहेत,

१) अभ्यास प्रदेशातील ग्रामीण प्रदेशातील दोन दशकांदरम्यान वाढलेली लोकसंख्या काढणे

२) अभ्यास प्रदेशातील एकूण ग्रामीण लोकसंख्येच्या स्थान निर्देशांकाद्वारे केंद्रीकरणाचे तालुकानिहाय तुलनात्मक अध्ययन करणे

## माहिती स्त्रोत व अभ्यास पद्धती :

प्रस्तुत संशोधन हे द्वितीयक स्त्रोतावर प्राप्त माहितीवर आधारित आहे. संबंधित माहिती जनगणना अहवाल, अमरावती, अकोला, वाशीम व बुलढाणा जिल्हा यातून संकलित केलेली आहे. तसेच जिल्हा आर्थिक समालोचन मधून संकलित केलेली आहे.

ग्रामीण प्रदेशातील लोकसंख्येचा केंद्रिकरण निर्देशांक हा देशपांडे सी.डी. (१९५३) यांनी सुचविलेल्या सूत्राच्या सहाय्याने काढण्यात आलेला आहे. त्यासाठी पुढील सूत्राचा उपयोग केलेला आहे.

$$LC = Pi \div Ai$$

LC – केंद्रिकरण निर्देशांक
Pi – दोन दशकांदरम्यान वाढलेली ग्रामीण लोकसंख्या
Ai – ग्रामीण क्षेत्रफळ

संकलित व सूत्राच्या सहाय्याने प्राप्त आकडेवारी सारणी मध्ये मांडून त्याचे वितरण हे अभ्यास प्रदेशाच्या नकाशामध्ये दर्शविलेले आहे.

**अभ्यास प्रदेश**

प्रस्तुत संशोधनाकरीता पश्चिम विदर्भातील पूर्णा नदी खोऱ्याची निवड करण्यात आलेली आहे. या खोऱ्याची उत्तरेकडील सीमा ही सातपुडा पर्वताच्या जलविभाजकाने निर्धारित केलेली असून पूर्व सीमा ही पूर्णा व वर्धा नदीच्या खोऱ्याने निश्चित झालेली आहे. पश्चिम विदर्भातील पूर्णा नदीच्या खोऱ्याचा अक्षवृत्तीय विस्तार हा २०°१०' उत्तर ते २१° ३०' उत्तर अक्षांशाच्या दरम्यान असून रेखावृत्तीय विस्तार हा ७६°०१' पूर्व ते ७७° ५६' पूर्व रेखांशाच्या दरम्यान असून या प्रदेशाचे एकूण क्षेत्रफळ हे १५६८०५२ चौ.कि.मी. एवढे असल्याचे आढळते. महाराष्ट्र राज्याच्या एकूण क्षेत्रफळापैकी सुमारे ५.०९% भूभागा अभ्यास प्रदेशाने व्यापलेले आढळून येते.

जनगणना २०११ च्या अहवालानुसार पश्चिम विदर्भातील पूर्णा नदीच्या खोऱ्यातील एकूण लोकसंख्या ही ५४६४०५९ एवढी असून त्यापैकी पुरुषांची संख्या ही २८०९००९ तर स्त्रियांची संख्या ही २६५४४३५ एवढी असल्याचे दिसते. अभ्यास प्रदेशातील एकूण लोकसंख्येच्या तुलनेत ग्रामीण लोकसंख्या ही ३४९२५२९ एवढी असून एकूण ग्रामीण लोकसंख्येपैकी सुमारे १८००१३७ पुरुष तर १६९२३९२ स्त्रियांची संख्या असल्याचे आढळते. एकूण लोकसंख्येशी ग्रामीण लोकसंख्येचे प्रमाण हे ६३.९१% असल्याचे दिसून येते.

**ग्रामीण लोकसंख्येचा केंद्रिकरण निर्देशांक (२००१ व २०११)**

पश्चिम विदर्भातील पूर्णा नदी खोऱ्याच्या प्रदेशातील ग्रामीण लोकसंख्येचा केंद्रिकरण निर्देशांक काढण्याकरीता १९९१ ते २००१ तसेच २००१ ते २०११ या काळात अभ्यास प्रदेशातील ग्रामीण लोकसंख्येत झालेली वाढ तसेच ग्रामीण क्षेत्रफळ या दोन घटकांचा अभ्यास करण्यात केला असता, २००१ या काळात ग्रामीण लोकसंख्येचा केंद्रिकरण निदेशांक हा २९.१९ इतका असल्याचे आढळत तर २०११ या काळात अभ्यास प्रदेशातील ग्रामीण लोकसंख्येचा केंद्रिकरण निर्देशांक हा १९.९१ इतका असल्याचे दिसते. यावरून असे स्पष्ट होत की, २००१ मध्ये अभ्यास प्रदेशात ग्रामीण लोकसंख्यचे केंद्रिकरण हे मध्यम स्वरूपाच झालले असून २०११ या काळात या निर्देशांकाचे मूल्य कमी झाल्याने येथिल ग्रामीण लोकसंख्येच केंद्रिकरण हे निम्न स्वरूपाच असल्याचे दिसते. अभ्यास प्रदेशाच्या तालुकानिहाय ग्रामीण लाकसंख्यचे केंद्रिकरण, अभ्यासण्यात आलले असून ते सारणी क्र. १ मध्ये दर्शविण्यात आलेले आहे (नकाशा क्र. १ व २).

सारणीनुसार पश्चिम विदर्भातील ग्रामीण लोकसंख्येच्या केंद्रिकरण निर्देशांकाचा तालुकानिहाय अभ्यास करण्याकरीता त्यास प्रमुख ०५ गटामध्ये विभागून त्याआधारे अती उच्च, उच्च, मध्यम, निम्न तसेच अती निम्न अशा प्रमुख ०५ गटात तालुक्यांची विभागणी करण्यात आली व त्याचे अध्ययन पुढील प्रमाणे केलेले आहे.

**सारणी क्र .१**

**अमरावती जिल्हा – ग्रामीण लोकसंख्येचा केंद्रीकरण निर्देशांक (२००१ व २०११)**

| तालुके | जिल्हा | Pi<br>ग्रामीण लोकसंख्या वाढ १९९१ ते २००१ | Pi<br>ग्रामीण लोकसंख्या वाढ २००१ते २०११ | Ai<br>ग्रामीण क्षेत्रफळ चौकिमी | LC<br>केंद्रीकरण निर्देशांक २००१ | LC<br>केंद्रीकरण निर्देशांक २०११ |
|---|---|---|---|---|---|---|
| तेल्हारा | अकोला | 21170 | 13503 | 554.99 | 38.14 | 24.33 |
| अकोट | अकोला | 21738 | 11136 | 699.83 | 31.06 | 15.91 |

International Journal for Multidisciplinary Research
International Conference on Multidisciplinary Research & Studies 2023
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com


| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| बाळापुर | अकोला | 19730 | 15161 | 623.27 | 31.66 | 24.32 |
| अकोला | अकोला | 28698 | 6243 | 979.64 | 29.29 | 6.37 |
| मुर्तीजापूर | अकोला | 14678 | 11248 | 874.63 | 16.78 | 12.86 |
| पातुर | अकोला | 15508 | 17489 | 668 | 23.21 | 26.17 |
| बार्शीटाकळी | अकोला | 20512 | 16643 | 690 | 29.72 | 24.12 |
| अमरावती | अमरावती | -33041 | 9111 | 356 | -92.92 | 25.62 |
| मोर्शी | अमरावती | 1058 | 534 | 13 | 78.65 | 39.70 |
| नांदगाव खंडेश्वर | अमरावती | 1642 | 1229 | 35 | 46.85 | 35.06 |
| चिखलदरा | अमरावती | 10380 | 7607 | 577 | 17.97 | 13.17 |
| धारणी | अमरावती | -64 | 94 | 6 | -10.60 | 15.57 |
| भातकुली | अमरावती | 9069 | 4486 | 451 | 20.09 | 9.94 |
| दर्यापूर | अमरावती | 17662 | 10765 | 613 | 28.83 | 17.57 |
| अंजनगाव सुर्जी | अमरावती | 9353 | 5309 | 455 | 20.55 | 11.66 |
| अचलपूर | अमरावती | 30026 | 21971 | 619 | 48.51 | 35.50 |
| चांदूर बाजार | अमरावती | 26003 | 4955 | 506 | 51.43 | 9.80 |
| बुलढाणा | बुलढाणा | 13529 | 13961 | 383 | 35.34 | 36.46 |
| चिखली | बुलढाणा | -16414 | 18481 | 679 | -24.19 | 27.23 |
| मेहकर | बुलढाणा | 5052 | 22193 | 706 | 7.16 | 31.43 |
| जळगाव जामोद | बुलढाणा | 22548 | 17853 | 557 | 40.49 | 32.06 |
| संग्रामपूर | बुलढाणा | 23845 | 16447 | 462 | 51.59 | 35.59 |
| शेगाव | बुलढाणा | 15251 | -1832 | 528 | 28.91 | -3.47 |
| नांदुरा | बुलढाणा | 15989 | 19798 | 430 | 37.20 | 46.06 |
| मलकापूर | बुलढाणा | 16341 | 13620 | 380 | 42.99 | 35.83 |
| मोताळा | बुलढाणा | 19209 | 22855 | 710 | 27.04 | 32.18 |
| खामगाव | बुलढाणा | 33287 | 48465 | 1002 | 33.20 | 48.35 |
| कारंजा लाड | वाशिम | 2055 | 1348 | 86 | 23.79 | 15.61 |
| मालेगाव | वाशिम | 131864 | -47694 | 657 | 200.77 | -72.62 |
| मंगरूळपीर | वाशिम | -46735 | 3859 | 113 | -415.32 | 34.29 |
| **एकूण** | | **449943** | **306838** | **15414.86** | **29.19** | **19.91** |

माहिती स्त्रोत –जनगणना पुस्तिका, अमरावती, अकोला, वाशीम, बुलढाणा जिल्हा
स्थान निर्देशांक – संशोधक स्वतः

**अती उच्च ग्रामीण लोकसंख्येचे केंद्रिकरण (निर्देशांक ४५ पेक्षा अधिक)**

International Journal for Multidisciplinary Research
International Conference on Multidisciplinary Research & Studies 2023
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com

पश्चिम विदर्भातील पूर्णा नदी खोऱ्याच्या प्रदेशात २००१ या काळात ग्रामीण लोकसंख्येचे अती उष्य केंद्रिकरण हे नांदगाव खंडेश्वर (४६.४५), अचलपुर (४८.५१). चांदूर बाजार (५१.४३), संग्रामपूर ( ५१.५९), मार्शी (७८.६५) व मालगाव (२००.७७) या ०६ तालुक्यात झालेले असून २०११ मध्ये केवळ नांदुरा व खामगाव तालुक्यात ग्रामीण लोकसंख्येये केंद्रिकरण हे अती उच्य असल्याचे दिसते व या तालुक्यातील ग्रामीण लोकसंख्यचा केंद्रिकरण निर्देशांक हा अनुक्रमे ४६.०६ व ४८.३५ इतका असल्याचे दिसते. म्हणजेच २००१ च्या तुलनेत २०११ मध्य अभ्यास प्रदेशातील ग्रामीण लाकसंख्यच अति उच्च केंद्रिकरण असलेल्या तालुक्यांची संख्या काळाच्या ओघात कमी झालली आहे.




**उच्च ग्रामीण लोकसंख्येचे केंद्रिकरण (निर्देशांक ३० ते ४५)**

प्रस्तुत अभ्यास प्रदेशाच्या बुलढाणा (३५.३४), मलकापूर (४२.९९), नांदुरा (३७.२०), खामगाव (३३.२०), बाळापूर (३१.६६), जळगाव जामोद (४०.४९), तेल्हारा (२८.१४), अकोट (३१.०६) या ०८ तालुक्यात ग्रामीण लोकसंख्येचे केंद्रिकरण उच्च आढळते. तर २०११ या काळात अभ्यास प्रदेशातील मोर्शी (३९.७०), बुलढाणा (३६.४६), मलकापूर (३५.८३), संग्रामपूर (३५.५९), जळगाव जामोद (३५.५९), अचलपूर (३५.५०), नांदगाव खंडेश्वर (३५.०६), मंगरूळपीर (३४.२९), मोताळा (३२.१८) व मेहकर (३१.४३) या १० तालुक्यात ग्रामीण लोकसंख्येचे उच्च केंद्रिकरण झाल्याचे आढळते.

**मध्यम ग्रामीण लोकसंख्येचे केंद्रिकरण (निर्देशांक १५ ते ३०)**

प्रस्तुत प्रदेशाच्या बार्शिटाकळी (२९.७२), अकोला (२९.२९), शेगाव (२८.९१), दर्यापूर (२८.८३), मोताळा (२७.०४), कारंजा (लाड) (२३.७९), पातूर (२३.२१), अंजनगाव सुर्जी (२०.५५), भातकुली (२०.०९), चिखलदरा (१७.९७) व मुर्तिजापूर (१६.७८) या ११ तालुक्यात २००१ या काळात ग्रामीण लोकसंख्येचे मध्यम केंद्रिकरण झालेले आढळते. तर २०११ मध्ये चिखली (२७.२३), पातूर (२६.१७), अमरावती (२५.६२), तेल्हारा (२४.३३), बाळापूर (२४.३२), बार्शिटाकळी (२४.१२), दर्यापूर (१७.५७), अकोट (१५.९१), कारंजा (लाड) (१५.६१), धारणी (१५.५७), चिखलदरा (१३.१७) व

मुर्तिजापूर (१२.८६), या तालुक्यात ग्रामीण लोकसंख्येचे मध्यम केंद्रिकरण आढळते. म्हणजेच २००१ च्या तुलनेत २०११ या काळात या वर्गवारीच्या तालुक्यांच्या संख्येत वाढ झाल्याचे दिसते.

**निम्न ग्रामीण लोकसंख्येचे केंद्रिकरण (निर्देशांक ० ते १२५)**

प्रस्तुत अभ्यास प्रदेशाच्या केवळ मेहकर तालुक्यात (७.१६) ग्रामीण लोकसंख्येचे निम्न केंद्रिकरण २००१ मध्ये झालेले असून २०११ या काळात चिखलदरा (१३.१७), मूर्तिजापूर (१२.८६), अंजनगाव सुर्जी (११.६६) भातकुली (९.९४), चांदुर बाजार (९.८०), व अकाला (६.३७) या ०६ तालुक्यात ग्रामीण लोकसंख्यच निम्न केंद्रिकरण झाल्याचे आढळते. म्हणजेच २००१ च्या तुलनेत २०११ या काळात या वर्गवारीच्याही तालुक्यांच्या संख्येत वाढ झाल्याच दिसते.

**अती निम्न ग्रामीण लोकसंख्येचे केंद्रिकरण (निर्देशांक ० पेक्षा कमी)**

पश्चिम विदर्भातील पूर्णा नदी खोऱ्याच्या प्रदेशातील मंगरूळपीर ( ४१५.३२), अमरावती (-९२.९२),. चिखली (-२४.१९) व धारणी (-१०.६०) या ०४ तालुक्यात वर्ष २००१ मध्ये ग्रामीण लोकसंख्येचे केंद्रिकरण हे निम्न असल्याचे आढळते. तर २०११ या काळात मालेगाव (-७२.६२) व शेगाव ( ३.४७) या ०२ तालुक्यात अती निम्न ग्रामीण लोकसंख्येच केंद्रिकरण झाल्याचे निदर्शनास येते. कारण वरील तालुक्यात २००१ तसेच २०११ या काळात ग्रामीण लोकसंख्यत ऋणात्मक वाढ झाल्याने ग्रामीण लोकसंख्यचा केंद्रिकरण निर्देशांक हा ऋणात्मक आढळतो. त्यामुळे हे तालुके अती निम्न ग्रामीण लोकसंख्यचे असलेल्या तालुक्यांच्या वर्गवारी मध्ये समाविष्ट करण्यात आलले आहे.

**निष्कर्ष व उपाययोजना**

अभ्यास प्रदेशातील मालेगाव आणि शेगाव या दोन तालुक्यात २००१ ते २०११ याकाळात ग्रामीण लोकसंख्या कमी झालेली आहे. त्यामुळे या प्रदेशातील स्थान निर्देशांक हा ऋणात्मक आढळतो. तसेच १९९१ ते २००१ याकाळात मंगरूळपीर, अमरावती,. चिखली व धारणी या तालुक्यांमध्ये ग्रामीण लोकसंख्या कमी झालेली आढळते. ग्रामीण लोकसंख्या प्रमाण कमी होणे म्हणजे त्या प्रदेशातील अस्थिरता दर्शविते. शेतीतून मिळणारे कमीउत्पन्न, रोजगाराचे अल्प प्रमाण, शिक्षण व आरोग्याच्या अपुऱ्या सोयी इत्यादी कारणांमुळे ग्रामीण प्रदेशातील लोकसंख्या ही नागरी प्रदेशात स्थाल्नात्रीत झालेली आहे. त्यामुळे केंद्रिकरण हे अतिशय कमी असलेले आढळते.

नागरी आणि ग्रामीण दोन्ही प्रदेशात लोकसंख्या वाढ ही नियंत्रित असणे आवश्य आहे. ग्रामीण भागातील शेती पद्धतीत सुधार्नाक्रणे, ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना अनुदान देणे, रोजगारांची उपलब्धता करणे, शेतीपूरक जोड धंद्यांना प्रोत्साहन देणे. सेंद्रिय शेतीचा अवलंब करणे, स्थानिक बाजारपेठेत शेतमालाला योग्य हमीभाव देणे, आरोग्य सुविधांचा विकास, इत्यादीमुळे ग्रामीण भागातील लोकसंख्या घटण्याचे प्रमाण कमी होईल. अभ्यास प्रदेशातील अमरावती, शेगाव आणि मालेगाव या तालुक्यात याची अमलबजावणी अत्यंत आवश्यक आहे. यामुळे ग्रामीण लोकसंख्या केंद्रिकरणातील असमानता कमी होईल. त्यामुळे कुठल्याही एका विशिष्ट प्रदेशात लोकसंख्येचा ताण पडणार नाही व ग्रामीण विकासाला गती प्राप्त होईल.

**संदर्भ सूची**

1. Ghosh B N, 1985, “Fundamentals of Population Geography a Reader”, Mc Grow Hill, New York pp 31-32
2. जनगणना पुस्तिका अमरावती, अकोला, वाशीम, बुलढाणाजिल्हा (२००१ व २०११), जनगणना विभाग, महाराष्ट्र राज्य, भारत सरकार
3. Spate O H K and Deshpande C.D. 1952, “The Indian Village” Geography, Journal Article, Vol 37, No 3, pp 142-152